*Indian Streams Research Journal*
Volume 2, Issue. 6, July 2012
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीयांच्या उन्नतीसाठीचे कार्य*

***छाया माधवराव नेम्मानीवार***

संशोधक विद्यार्थीनी,52 I.2 निर्मल कलश अपार्टमेंट
गनेडीवाल ले—आऊट (भाग्यनगर),कॅम्प, अमरावती—444602

***प्रस्तावना :—***

हजारो वर्षापासून चुकीच्या रूढी—परंपरांच्या बंधनात अडकून पडलेल्या स्त्रियांना मुक्त करण्याचे कार्य बाबासाहेब आंबेडकरांनी केले. कायद्याने स्त्रियांना अधिकार प्राप्त करून देऊन बाबासाहेबांनी स्त्रियांना विकासाची दारे उघडून दिली. शिक्षणाशिवाय स्त्रियांची प्रगती नाही म्हणून स्त्री शिक्षणाचा बाबासाहेबांनी पुरस्कार केला. अन्यायाविरूध्द संघटित होऊन लढा देण्याची शक्ती बाबासाहेबांनी स्त्रियांमध्ये निर्माण केली. भारतीय स्त्रियांच्या गुलामगिरीचे विश्लेषण करून तिला कायद्याने न्याय हक्क मिळवून देण्याचे तसेच वर्ण, वर्ग, आणि जाती संस्था यामध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्याचे काम हिंदू कोड बीलाची निर्मिती करून बाबासाहेबांनी केली. बाबासाहेबांनी स्त्रियांना सन्मान, प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत प्रयत्न केले. बाबासाहेबांच्या कार्यामुळेच आज स्त्रियांनी सर्व क्षेत्रात प्रगती केलेली आहे. आपल्या अधिकारांसाठी संघटित होऊन लढा देण्याचा वैधानिक मार्ग बाबासाहेबांनी स्त्रियांना दिला. बाबसाहेबांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी केलेले कार्य महान आहे.

समस्त दलित वर्गाला श्माणूसश म्हणून जगण्याचे हक्क मिळवून देतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांबरोबरच स्त्रियांनाही त्यांच्या हक्काची जाणीव करून देऊन स्त्रीयांना उन्नतीचा मार्ग दाखविला. हजारो वर्षापासून चुकीच्या रूढी परंपराच्या बंधनात अडकून पडलेल्या स्त्रीयांना मुक्त करण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. स्त्रीयांना कायद्याने अनेक अधिकार देवून सन्मानाने जगण्याचे बळ त्यांच्यात निर्माण केले. डॉ. बाबासाहेबांचे हे कार्य महान आहे. म्हणूनच त्यांना महामानव असे म्हटले जाते.

भारतात पूर्व वैदिक काळात स्त्रियांचा समाजातील दर्जा उच्च होता.[1] पुढे उत्तर वैदिक काळात मात्र स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावला. स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने येत गेली. स्त्रियांच्या अधिकाराचे हनन झाले.[2] बुध्दकाळात स्त्रियांची स्थिती थोडी बदलली. भगवान बुध्दाने भिक्षुणी संघाच्या रूपाने स्त्रियांना आत्मोन्नतीचा मार्ग दाखविला. स्त्रियांना ज्ञानप्राप्तीचा अधिकार दिला.[3] पुढील काळात मात्र स्त्रियांची स्थिती बदलून गेली. स्त्रियांवरील बंधनाची पकड दिवसेंदिवस घट्ट होत गेली. मध्यकाळात स्त्रियांना कोणत्याही क्षेत्रात स्वातंत्र्य राहीले नाही. स्त्रियांशी संबंधीत अनेक वाईट प्रथा अस्तित्वात आल्या. स्त्रियांच्या दुखाला सीमा प्रथा राहीली नाही. स्त्रीला जन्मापासून तर मृत्यूपर्यंत विविध बंधनात राहून दुखमय अवस्थेत जीवन जगावे लागे. कोणतेही स्वातंत्र्य नाही, अधिकार व शिक्षण नाही फक्त 'चूल आणि मुल' इतकेच स्त्रीचे जीवन, अशी वाईट अवस्था स्त्रियांची बनली. पुढे इंग्रजांच्या आगमनाने आणि भारतीय समाज सुधारकांच्या प्रयत्नाने भारतीय स्त्रियांच्या स्थितीत परिवर्तन होण्यास सुरूवात झाली. इंग्रजांनी भारतात मुलींसाठी शाळा सुरू केल्या आणि स्त्रियांशी संबंधीत वाईट प्रथा कायद्याने बंद केल्या. तत्कालीन भारतीय समाज सुधारकांनी या कार्यात इंग्रजांना मदत केली. राजाराम मोहनराय, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, बाळशास्त्री जांभेकर, पंडिता रमाबाई, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी शिंदे, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ. समाजसुधारकांनी वाईट

**Please cite this Article as :** *छाया माधवराव नेम्मानीवार* , *डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रीयांच्या उन्नतीसाठीचे कार्य* **: Indian Streams Research Journal (July ; 2012)**

रूढी–परंपरांच्या बंधनातून स्त्रियांना मुक्त केले. सोबतच स्त्रीयांना अधिकार मिळवून देऊन त्यांना उन्नतीचा मार्ग दाखविला.[4]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण जीवनकाळात स्त्रीयांच्या उन्नतीसाठी कार्य केले. कायद्याने स्त्रियांना सर्व अधिकार प्राप्त करून दिले. महामानव सिध्दार्थ गौतम बुध्द, कबीर, महात्मा ज्योतीबा फुले यांना गुरू माननारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत स्त्री मुक्तीच्या कार्यासाठी प्रयत्नरत होते.

कोणत्याही देशाची प्रगती ही त्या देशातील स्त्रियांच्या प्रगतीशिवाय होऊ शकत नाही. स्त्रियांच्या विकासाशिवाय परिवार, समाज आणि राष्ट्राचा विकास होऊ शकत नाही. स्त्री केवळ परिवाराची सूत्रधार नसून ती लोकशाहीची आधार शीला आहे. स्त्री समाजाचा महत्वपूर्ण घटक आहे. ही गोष्ट लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांच्या उन्नतीकडे त्यांच्या विकासाकडे लक्ष दिले. एक स्त्री शिक्षीत झाली तर सर्व कुटुंब शिक्षीत होते असे बाबासाहेबांना वाटत होते.

अज्ञान हेच सर्व दुखाचे मूळ कारण आहे. शिक्षणाने मनुष्य दुखमुक्त होऊ शकतो. ही गोष्टी लक्षात घेऊन बाबासाहेबांनी सर्व प्रथम स्त्रियांमधील अज्ञान नष्ट करण्याचा प्रयत्न केला. शिक्षणानेच स्त्रियांना स्वातंत्र्य व अधिकार मिळू शकतात. म्हणून बाबासाहेबांनी स्त्रिशिक्षणाचे समर्थन केले. शिक्षण हे मनुष्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी किती आवश्यक आहे आणि या सर्वांगीण उन्नतीची फक्त पुरूषालाच नव्हे तर स्त्रियांनाही कशी आवश्यकता आहे हे त्यांनी स्वत विद्यार्थी असतांना एका पत्रात नमूद करून ठेवले आहे. सातारा शहरातल्या आपल्या कन्येला शिकवणाऱ्या जमादार जाधव यांना बाबासाहेबांनी स्वत विद्यार्थी असतांना अमेरिकेतून एक पत्र पाठविले होते. आपल्या मुलीला बाहेरगावी ठेवून शिक्षण देऊ इच्छिणाऱ्या त्या वडिलांविषयी वाटणारा आदरभाव त्यांनी या पत्रातून व्यक्त केला. सोबतच शिक्षणाच हे महत्व प्रत्येक घरात पोहचल पाहिजे अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. शिक्षणाचा प्रसार हे प्रगतीच साधन आहे या गोष्टीवर बाबासाहेबांचा विश्वास असल्याने हे शिक्षण मुलींनाही मिळायला हवं हे त्यांना स्वतच्या विद्यार्थी दशेपासूनच वाटत होते.[5]

मुलींच्या शिक्षणांसदर्भात बाबासाहेब नुसते विचार मांडत राहिले नाहीत, तर त्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष प्रयत्न केले. बहिष्कृत हितकारिणी सभा, भारतीय बहिकृत समाज शिक्षण प्रसारक मंडळ, पिपल्स एज्युकेशन सोसायटी या संघाची स्थापना करून त्या अंतर्गत सिध्दार्थ कॉलेज आणि मिलिंद महाविद्यालय सुरू केले. जिथे त्यांनी मुलांच्याबरोबर मुलींनाही प्रवेश दिला.[6] शिक्षणानेच स्त्रियांना त्यांचे अधिकार प्राप्त होऊ शकतात. त्यांच्या जगण्यावरील पुरूषप्रधान संस्कृतीचा अंकुश ते झुगारून देऊ शकतात. हा विचार समाजात प्रसारीत झाला पाहिजे म्हणून बाबासाहेबांनी आपल्या लेखनात, भाषणात, शशिक्षणश या विषयाला आणि त्याचबरोबर 'स्त्रीशिक्षण' या विचाराला अधिक प्राधान्य दिले.[7] स्त्री ही एक व्यक्ती आहे. व्यक्ती म्हणून तिला स्वातंत्र्य असलंच पाहिजे यावर बाबासाहेबांचा भर होता. शिक्षणाबरोबच बाबासाहेबांनी स्वच्छतेवर भर दिला. परिस्थिती गरिबाची असणं हा गुन्हा नाही पण अस्वच्छ राहणं हा गुन्हा आहे. आपल्या मुलांमुलींना शाळेत पाठवणं, नवरा चुकीच्या गोष्टी करत असेल तर बायकोनं त्याला विरोध करण आणि आपण आपलं घर स्वच्छ ठेवण याबाबत स्त्रीनेच पुढाकार घेतला पाहिजे. मनात आणलं तर घरातल्या काही पध्दतीत, रीतीरिवाजात बदल करण्याचा हक्क स्त्री नक्कीच राबवू शकते, याची जाणीव बाबसाहेबांनी स्त्रियांना वेळोवेळी करून दिली.[8]

केवळ सर्वसामान्यांच्या घरातल्या मुलीबाळीसाठीच नव्हे तर ज्या स्त्रियां रूढींच्या, दृष्ट प्रथांच्या बळी ठरल्या अशा मुरळी, देवदासी, जोगतिणी यांच्या समुदायापुढेही बाबसाहेबांनी सन्मानानं जगण्यासंबंधी विचार मांडले.[9]

कामगार स्त्रियांच्या प्रश्नातही बाबासाहेबांनी लक्ष घातलं स्त्री कामगारांच्या हिताच्या दृष्टीनं विधीमंडळात मांडलेल्या व नंतरच्या काळात विश्रांतीची गरज असल्याने त्यांच्या पगारावर होणारा खर्च मालकांनीच सोसला पाहिजे असं मत आग्रहपूर्वक मांडल. मजूर व कामगार स्त्रियांच्या हिताकरीता आवश्यक इतरही अनेक मागण्यांचा आग्रह बाबासाहेबांनी धरला. अस्पृश्यता निवारण झाल्याशिवाय स्त्रियांचे प्रश्न सुटणार नाहीत याची बाबासाहेबांना खात्री होती आणि त्यासाठी, अस्पृश्यता निवारण्याच्या कामासाठी स्त्रिया पुढे आल्या पाहिजेत अस त्यांना वाटे. म्हणूनच त्यांनी अस्पृश्य स्त्रियांच्या वेगळया राजकीय परिषदा आयोजित केल्या.[10]

स्त्रियांचे हक्क, त्यांची उन्नति, विकास यासाठी नुसते विचार मांडून, भाषणं करून उपयोग नाही तर त्यासाठी कायद्यात तशी तरतूद करावी लागेल हे ओळखून बाबासाहेबांनी 'हिंदू कोड बील' तयार केले. भारतीय स्त्रियांच्या गुलामगिरीचे विश्लेषण करून तिला कायद्यानेन्याय हक्क मिळवून देण्याचे तसेच वर्ण, वर्ग आणि जातीसंस्था यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्याचे काम हिंदू कोड बिलाची निर्मिती करून बाबासाहेबांनी केली. स्त्री हक्काचा कायदेशीर जाहीरनामा या कोडबिलाद्वारे त्यांनी निर्माण केला. एकंदरीत भारतीय स्त्रियांची परिस्थिती आणि धर्म, वर्ण, जात या सर्व व्यवस्थांमध्ये तिची होणारी पिळवणूक थांबावी आणि तिला माणूस म्हणून जगण्याचे अधिकार प्राप्त व्हावेत हा दृष्टिकोन डोळयासमोर ठेवून आंबेडकरांनी हिंदू कोड बीलाची मांडणी केली.[11] 12 ऑगस्ट 1948 ला सुधारित हिंदू कोड बील बाबासाहेबांनी संसदेत मांडले.[12] बाबासाहेबांनी भारतीय संविधानात समतेचा पुरस्कार केला. स्वातंत्र्य, समता व बंधुता या गौतम बुध्दाच्या विचारांना भारतीय संविधानात समाविष्ट करून बुध्दांच्या विचारांना भारतीय जनतेसमोर आणले. भारतीय संविधानाने स्त्रियांना अधिकार देवून त्यांना उन्नतीची संधी दिली.

बाबासाहेबांनी अन्याय, अत्याचाराने ग्रस्त असलेल्या भारतीय नारीला कायद्याने अधिकार प्राप्त करून देवून

विकासाची संधी दिली. त्यामुळे आज एकविसाव्या शतकात सर्वच क्षेत्रात स्त्रियांनी प्रगती केली आहे. आपल्या अधिकारासाठी स्त्रिया संघटित रित्या संघर्ष करीत आहे. आपल्या अधिकारांसाठी संघटित होऊन संघर्ष करण्याचा वैधानिक मार्ग बाबासाहेबांनी स्त्रियांना दिला.

***निष्कर्ष –***

1.बाबासाहेबांनी स्त्रियांमध्ये स्वाभिमानाची भावना निर्माण केली.
2.बाबासाहेबांच्या मार्गदर्शनाने भारतीय स्त्रिया संघटित झाल्या.
3.अनिष्ट रूढी–परंपरांच्या बंधनातून स्त्रियांना मुक्त करण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले.
5.बाबासाहेबांनी स्त्री शिक्षणाचा प्रसार केला. भारतीय स्त्रियांना कायद्याने मूलभुत अधिकार मिळवून देण्याचे महत्वाचे कार्य बाबासाहेबांनी केले.
6.स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले.
7.बाबासाहेबांच्या प्रयत्नामुळे भारतीय स्त्रियांची उन्नती झाली.

***संदर्भ***

1)सरोजीनी बाबर, स्त्री शिक्षणाची वाटचाल, मुंबई 1968 पृ.6.
2)प्र.रा. देशमुख, ऋग्वेद व हिंदु संस्कृती, वाई, 1996 पृ. 48.
3)मुन्सीलाल गौतम, बुध्दाचा मानवतेचा संदेश, सिध्दार्थ गौतम शिक्षण संस्कृती समिती, अलीगढ, पृ. 113.
4)गणेश राऊत, ज्योती राऊत, महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, डायमंड प्रकाशनपुणे, 2009, पृ. 174.
5)मंगला आठलेकर, महापुरूषांच्या नजरेतून स्त्री, मेनका प्रकाशन, पुणे 2009 पृ. 246
6)दिनेश मोरे, आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, के.एस. पब्लिकेशन, पुणे 2006 पृ. 313,314.
7)मंगला आठलेकर, उपरोक्त पृ. 247
8)कित्ता पृ. 248
9)कित्ता पृ. 251.
10).कित्ता पृ. 253
11)वंदना महाजन, सांस्कृतिक प्रवाहांची स्त्रीवादी समीक्षा, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे 2011 पृ. 112
12)धनंजय कीर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई, 2009, पृ. 623